# शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती

**१) प्रस्तावना :** राज्यातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन स्तरांवरील विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयामध्ये पी.एचडी. करता यावी या उद्देशाने ही शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती **शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एससीएच १०८२/४१९९/विशि-३, दि. १३ ऑगस्ट १९८५ अन्वये सुरु करण्यात आलेली आहे.**

२) संच संख्या : शिष्यवृत्ती मंजुरीसाठी राज्यस्तरीय स्तरावर ३ व महाविद्यालयीन स्तरांवर ११ संच विहित केलेले आहेत. ते खालीलप्रमाणे:

**१) राज्यस्तर :** शिक्षण संचालनालयाच्या स्तरांवर गठित केलेल्या समितीमार्फत – ३ संच.

**२) महाविद्यालयीन स्तर** : महाविद्यालयीन स्तरांवर प्राचार्यांनी गठित केलेल्या समितीस शिक्षण संचालनालयाकडून गठित समितीस परवानगी दिल्यानंतर खालीलप्रमाणे महाविद्यालयांसाठी संच निर्धारित केलेले आहे :

| | |
|---|---|
| १) विज्ञान संस्था, मुंबई. | ३ |
| २) विज्ञान संस्था, नागपूर. | ३ |
| ३) विज्ञान संस्था, औरंगाबाद. | ३ |
| ४) शासकीय विदर्भ महाविद्यालय, अमरावती | १ |
| ५) वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था, नागपूर | १ |
| **एकूण संच** | ११ |

**३) पात्रता :**

१) शिक्षण संचालकांच्या स्तरांवर गठित केलेल्या समितीमार्फत प्राप्त आवेदनपत्रांची छाननी करून, गुणवत्तेनुसार विहित तीन संचांची निवड केली जाते.

२) महाविद्यालयीन स्तरांवर प्राचार्यांनी गठित केलेल्या समितीमार्फत पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रम व इतर संशोधनपर रेकॉर्ड पाहून त्यांनी विहित केलेल्या संचास अधीन राहून प्राचार्यांकडून निवड केली जाते.

३) या शिष्यवृत्तीसाठी उत्पन्न मर्यादा नाही.

४) संबंधित छात्र कोठेही सेवेत नसावा तसेच त्यांनी इतर कोणतीही शिष्यवृत्ती घेतलेली नसावी.

५) संबंधित विद्यार्थ्याने पी.एचडी. संबंधी विद्यापीठामध्ये रीतसर नोंदणी करुन, संबंधित मार्गदर्शकाने शिफारस करणे आवश्यक आहे.

**४) अर्ज कोठे मिळतात :** संबंधित विद्यापीठे व महाविद्यालयांना आवेदनपत्रे उपलब्ध करून दिले जातात.

**५) अर्ज कोणामार्फत पाठवितात :** संबंधित विद्यापीठ किंवा महाविद्यालयांनी शिक्षण संचालक [उच्च शिक्षण] महाराष्ट्र राज्य, पुणे-१. यांचेकडे अर्ज पाठवावयाचे आहेत. अर्ज उपलब्ध करून देऊन, त्यांचे स्तरांवरील अर्जावर संबंधित प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना संचालक, शिक्षण संचालनालय [उच्च शिक्षण], यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर राज्यस्तरीय व महाविद्यालयीन स्तरांवरील स्वयंपूर्ण प्रस्ताव शासनाकडे पाठविल्यानंतर, त्या संबंधिचे शासन निर्णय निर्गमित होताच, नवीन मंजुरी व नूतनीकरणासाठी संचालनालयाच्या स्तरावर मंजुरी दिली जाते.

महाविद्यालयीन स्तरांवरील विहित संचावरील खर्च भागविण्यासाठी महाविद्यालयांनी केलेल्या मागणीनुसार शिक्षण संचालनालय [उच्च शिक्षण], स्तरांवरून अनुदान प्राप्त करून दिले जाते.

**६) दर :** प्रत्येक विद्यार्थ्यास मासिक रु. ४००/- शिष्यवृत्ती व रु. ५०/- सादिलवार खर्चापोटी मंजूर केले जातात.

७) शा.नि.क्र.एस.सी.एच २००३/ (४०५/०३)/ मशि- १ दि. ५ फ्रेब्रुवारी, २००४ अन्वये शिष्यवृत्तीच्या दरांचे खालीलप्रमाणे बदल करण्यात आलेले आहे.

| पूर्वीचे दर | दि. ५।२। २००४ च्या शा.नि. नुसार सुधारित केलेले दर |
|---|---|
| रु. ४००/- द.म. | रु. ७५०/- द.म. |
| रु. ५०/- द.म. सादीलवार खर्च | + रु. १०००/- वार्षिक सादीलवार खर्च |

८) शासन निर्णय क्र. एस.सी.एच २००३/(४०५/०३)/मशि-१ दि. ५ फ्रेब्रुवारी, २००४ अन्वये, शिष्यवृत्तीच्या दरांमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात आलेला आहे.

| पूर्वीचे दर | सुधारित दर |
|---|---|
| रु. ४००/- द.म. + | रु. ७५०/- द.म. |
| रु. ५०/- द.म. सादीलवार खर्च | + रु. १०००/- वार्षिक सादीलवार खर्च |